**योजनेचे नांव** :- **ग्रामपंचायतींना जनसुविधा पुरविणे**

१ योजना कोणाची :- जिल्हा वार्षिक योजना

२ योजनेची संक्षिप्त माहिती :-

ग्राम विकास व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन कडील शासन निर्णय क्र.ददभू/2010/ प्र.क्र.62/ दि.16/9/2010 व ग्राम विकास विभागा कडील शासन निर्णय जनसु-२०१७/ प्रक्र-१११/ यो-६ दि.२५/०१/२०१८ नुसार योजनेच्या मार्गदर्शक सुचना व घेणेत येणारी कामे :-

| अ.क्र | कामे | खर्च मर्यादा (लाख) |
|---|---|---|
| 1. (अ) | **ग्रामीण भागात दहन/दफन भूमीची व्यवस्था करणे व त्या सुस्थितीत ठेवणे व त्याचे नियमन करणे यासाठी स्मशानभूमीवर हाती घ्यावयाची कामे :-**<br>१. दहन /दफन भूसंपादन 2. चबुत-याचे बांधकाम 3. शेडचे बांधकाम 4. पोहोच रस्ता 5. गरजे नुसार कुंपन व भिंत घालून जागेची सुरक्षितता साधणे. 6.दहन/दफन भूमीत विद्युतीकरण व आवश्यकते नुसार विद्युत दाहीणी /सुधारित शवदाहीणीची व्यवस्था 7. पाण्याची सोय. 8. स्मशानघाट / नदीघाट बांधकाम (स्मशान व्यवस्थेसाठी आवश्यक तेवढे) 9. जमीन सपाटीकरण व तळ फरशी बसविणे 10.स्मृतीउद्यान. | 20.00 |
| 1. (ब) | **ग्रामपंचायत भवन/कार्यालय याबाबत हाती घ्यावयाची कामे :-**<br>१. नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकाम व इमारती अंतर्गत सुविधा<br>२. जुन्या ग्रामपंचायत इमारतीची पुर्नबांधणी / विस्तार<br>३. ग्रामपंचायतीच्या आवारामध्ये वृक्षारोपण, परिसर सुधारणा, परिसराला कुंपन घालणे व इतर अनुषंगीक कामे | 20.00 |
| 1. (क) | **जनसुविधा योजनेंतर्गत कामांची व्याप्ती वाढविणे :-** | |
| | 1.ग्रामपंचायत हद्दीत आठवडी बाजार केंद्र विकसित करणे | 15.00 |
| | 2.गावतलावातील गाळ काढून गावतलावांचे सुशोभिकरण करणे | 15.00 |
| | 3.घनकचरा व्यवस्था करणे | 20.00 |
| | 4.भुमीगत गटार बांधणे | 15.00 |
| | 5.ग्रामपंचायत हद्दीमध्ये अस्तित्वात असलेल्या विहीरींवर सौर ऊर्जेवर आधारित दुहेरी हातपंप बसविणे तसेच जलशुध्दीकरण आर ओ प्लांटची व्यवस्था करणे | 20.00 |
| 1. (ड) | **जनसुविधा योजनेंतर्गत घेण्यात येणारे रस्ते**<br>१. गावांतर्गत रस्ते 2. एका वस्ती/ पाडयापासून दुसऱ्या वस्ती /पाडयापर्यंत जोड रस्ता बांधणे | 20.00 |

योजनेचे निकष व अटी शर्ती

1. ग्रामपंचायतीची मागणी , ठराव
2. ग्राम पंचायत मालकीच्या जागेचा उतारा
3. निवडलेले काम रस्ता असेल तर त्याची नांेद असलेला ग्रा.प.नमुना नं.26 चा उतारा
4. समजुतीचा नकाशा
5. जि.प.सर्वसाधारण सभेच्या शिफारशीने जिल्हा नियोजन समितीची मान्यता
6. योजनेचे फायदे

- ➢ दहन/दफन भूमी सोईमुळे मृतदेहावर अंत्यसंस्कार करुन धार्मिक विधी करणे सोईचे होणार आहे.
- ➢ ग्रामपंचायतीची अद्यावत कार्यालयीन इमारत झालेमुळे ग्राम पंचायतींचे कामकाज करणे व नागरीकांना सोयीसुविधा पुरविणे सुलभ होणार आहे.
- ➢ बाजारपेठ सोय, शुध्दपिण्याच्या पाण्याची सोय , जलस्त्रोतांचे बळकटीकरण, घनकचरा व सांडपाण्याचे व्यवस्थापन इ. सोयी सुविधा उपलब्ध होणार आहेत.